GR-200408031649501-1201

जवाहर रोजगार योजना १९९०-९१

योजनेची आखणी, अंमलबजावणी, निरिक्षण यंत्रणा आणि संनियंत्रणाबाबत.

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास विभाग,
शासन निर्णय, क्र. जेआरवाय १०९०/सीआर १०२६/५२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक १७ नोव्हेंबर, १९९०.

वाचा - १) शासन निर्णय, क्र. जेआरवाय १०८९/सीआर १२९३/५२,
दिनांक ३ ऑगस्ट, १९८९.
२) शासन निर्णय, क्र. जरोयो १०९०/सीआर १५२३/जरोयो-५/५२,
दिनांक २३ एप्रिल, १९८९.

प्रस्तावना-निर्णय :- केंद्र सरकारने राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम व ग्रा.भू.रो.ह.कार्यक्रमांचे विलिनीकरण करुन दिनांक १.४.१९८९ पासून "जवाहर रोजगार योजना" अंमलात आणली व त्यासाठी ८०% केंद्र सरकार व २०% राज्यसरकार या प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिला जाणार आहे. या योजनेसंबंधी केंद्रसरकारने वेळोवेळी प्रशासकीय आदेश व योजनेच्या अंमलबजावणीच्या संदर्भात मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. तदनंतर राज्यशासनाने शासन निर्णय, दिनांक ३ ऑगस्ट, १९८९ अन्वये योजनेचे नियोजन, आखणी, अंमलबजावणी इत्यादी बाबत सर्व आवश्यक आदेश निर्गमित केले आहेत.

२. जवाहर रोजगार योजनेची अंमलबजावणी करताना केंद्रसरकारने १९९०-९१ या सालापासून राज्यसरकारच्या रोजगार हमी योजनेच्या धर्तीवर मार्गदर्शक तत्वात मूलभूत बदल केले आहेत. त्याप्रमाणे चालू आर्थिक वर्षापासून जवाहर रोजगार योजनेअंतर्गत मजुरी व साहित्य खर्चाच्या प्रमाणात ५०:५० या ऐवजी ६०:४० असे प्रमाण साध्य करण्यात यावे अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत.

योजनेची उद्दिष्टे

३. जवाहर रोजगार योजनेअंतर्गत केंद्रसरकारने १९८९-९० मधील मार्गदर्शक तत्वातील प्राथमिक उद्दिष्टामध्ये योजनेखाली रोजगार देत असतांनाचिर- उत्पादक स्वरूपाचे सामुहिक मालमत्ता निर्माण व्हावी ह्या ऐवजी ग्रामीण भागातील बेरोजगार व अर्ध रोजगार स्त्री व पुरुषांना सतत कामासाठी रोजगार पुरविणे हे उद्दिष्ट ठरवून दिले आहे.

३.१. दुय्यम उद्दिष्ट म्हणून ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला बळकटी आणण्याकरीता आणि सुविधा व ग्रामीण भागातील गरीबांकरीता

प्रत्येक गावात देणाऱ्या कामामध्ये, निर्माण करून रोजगाराची निर्मिती सार्वत्रिकपणे करून ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनमानामध्ये सुधारणा करणे असे आहे. या योजनेतील रोजगार पुरविताना दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींना लक्ष करविण्यात आलेले आहे. तर रोजगार देताना अनुसूचित जाती व जमातींच्या व्यक्तींना प्राधान्याने देण्यात यावा व ३० % रोजगाराच्या संधी स्त्रियांकरीता राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत.

निधी वितरण निकष

४. केंद्रसरकारने राज्यांना निधी वाटून देताना राज्यातील ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्या ग्राह्य धरलेली आहे. तसेच जिल्ह्यांना निधी वितरण करताना ग्रामीण भागातील एकूण कामगारांच्या शेत मजूरांच्या प्रमाणात २० % ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात ६० % आणि जिल्ह्याचे कृषि उत्पन्नाच्या व्यस्त प्रमाणात २० % अशा प्रकारे जिल्ह्यांची एकूण तरतूद ठरवून देण्यात आलेली आहे. जवाहर रोजगार योजनेअंतर्गत ग्रामपंचायतींना निधी वितरण करताना एक हजार लोकसंख्येच्या आतील पंचायतीची एक हजार लोकसंख्या ग्राह्य धरून व १० हजार लोकसंख्येच्या वरील पंचायतींना १० हजार लोकसंख्या ग्राह्य धरून निधी उपलब्ध करून द्यावयाचा आहे. सदरहू लोकसंख्या ग्राह्य धरताना ग्रामपंचायती मधील अनुसूचित जाती व जमातीच्या लोकसंख्येच्या ६० % निधी व उर्वरित लोकसंख्येच्या ४० % निधी पंचायतींना उपलब्ध करून द्यावयाचा आहे. येथे आणखी खात्री करून घ्यावयाची आहे की, जिल्ह्याच्या आर्थिक तरतुदीच्या ८० % निधी ग्रामपंचायतींना उपलब्ध करून दिला जावा. उर्वरित २० % रकमेचा जिल्हास्तरावर मागील वर्षांची अपूर्ण राहिलेली कामे पूर्ण करण्याकरीता विनियोग करावयाचा आहे.

आस्थापना व वेतन [illegible] अनुदान तरतूद

५. केंद्रसरकारच्या सूचनांप्रमाणे इंदिरा आवास योजनेकरीता जिल्ह्यातील ग्रामीण अनुसूचित जाती व जमातीच्या लोकसंख्येच्या ६% निधी राखीव ठेवण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे राज्य, जिल्हा व गटपातळीवर निर्माण करण्यात आलेल्या कर्मचारीवृंदाकरीता आस्थापना निधी अनुज्ञेय आहे. राज्यस्तरावर निर्माण करण्यात आलेल्या कर्मचारीवृंदाचा खर्च भागविण्याकरीता काही जिल्ह्यांचे आस्थापना निधीमधून वजा केला जाणार आहे. आणि म्हणून जिल्ह्याने राज्यशासनाने ठरवून दिलेल्या आस्थापना निधीचे रकमेमधून आस्थापना खर्च भागवावा. या रकमेच्या

व्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणासाठी अस्थापना बाबींवर अति-रिक्त निधी उपलब्ध करून दिला जाणार नाही, याची कृपया नोंद घेण्यात यावी. केंद्र शासनाच्या नवीन मार्गदर्शक तत्वानुसार असे विहित केले आहे की, जिल्ह्यांच्या आर्थिक तरतुदीच्या २% निधी प्रशासकीय व आकस्मिक खर्चाकरिता अनुज्ञेय राहील. मागील वर्षापर्यंत मुख्य बाबींवर ५% पर्यंत खर्च करण्याची मुभा होती. १९८९-९०च्या प्रशासकीय व आक-स्मिक खर्चाकरिता सुमारे रु. ८२ कोटी खर्च पुरेसा असल्याचे दिसून [illegible] या बाबीमध्ये कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते, लेखन व मुद्रणसामग्री, [illegible] [illegible] देखभाल इत्यादि वरील खर्च भागविणे शक्य आहे. या तरतुदीमधून कमाल रु. ५०,००० पर्यंत कर्मचारी/अधिकारी आणि लोकप्रतिनिधींच्या प्रशिक्षणावर खर्च करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

निधी वितरण

६. केंद्र सरकारने ठरवून दिलेल्या विविध विभागांतर्गत जसे आदिवासी उपयोजना, इंदिरा आवास योजना, दशलक्ष विहिर योजना [जीवनधारा योजना] अपूर्ण कामे पूर्ण करण्याकरिता राखीव निधी आणि मालमत्तांच्या परिरक्षणाकरिता राखीव ठेवलेला निधी, या सर्व बाबींवर स्वतंत्रपणे तरतूद केल्यानंतर जिल्हास्तरावर उर्वरित एकूण तरतुदीच्या ८०% निधी ग्रामपंचायतींना वितरित करावयाचा आहे. ग्राम पंचायतींना चालू आर्थिक वर्षापासून निधी वितरणाच्या निकषामध्ये बदल केल्यामुळे काही ग्रामपंचायतींना मागील वर्षाच्या तुलनेत चालू आर्थिक वर्षात कमी निधी उपलब्ध होण्याची शक्यता आहे. अशा पंचायतींना जादा निधी उपलब्ध करून देण्याची चालू आर्थिक वर्षात तरतूद केलेली नाही. २०% राखीव ठेवलेला निधी मागील वर्षी घेण्यात आलेली कामे परंतु दिनांक १. ४. १९९०रोजी अपूर्ण असलेली कामे पूर्ण करण्याकरिता विनियोजित करण्यात यावा. अपूर्ण कामे प्राधान्याने पूर्ण करण्यात यावीत. याकडेही विशेष लक्ष पुरवावे.

जिल्ह्यांना निधी वाटपाची पध्दत

७. १९८९ पासून राज्यात जवाहर रोजगार योजना कार्यान्वित करण्यात आलेली आहे. केंद्राने उपलब्ध करून द्यावयाचा ८०% हिस्सा मागील वर्षी प्रत्यक्ष सर्व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांना उपलब्ध करून दिलेला आहे व राज्याने २०% हिस्सा राज्यस्तरावरून सर्व जिल्ह्यांना वितरित केलेला आहे. १९९०-९१ च्या आर्थिक वर्षापासून केंद्र

उपलब्ध निधी वितरणाचे पत्रकातील बदल करून जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडे परस्पर निधी वितरण न करता तो राज्यांना निधी उपलब्ध करून देण्यात येतो व हा निधी राज्य व केंद्र सरकार यांनी त्यांच्या ठरवून दिलेल्या ८०:२० च्या निधी प्रमाणे ग्राम पंचायती व जिल्ह्यामध्ये वितरित करावयाचा आहे. राज्य व केंद्राचा व राज्याचा हिस्सा मिळून जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेने ... ८ दिवसांचे आत सर्व ग्रामपंचायतींना निधी उपलब्ध करून देण्याचे बंधन घालून दिले आहे.

८. जवाहर रोजगार योजनेअंतर्गत एकूण जिल्ह्याच्या आर्थिक तरतुदीच्या ६% निधी ... अशा योजनेकरिता राखीव ठेवल्यानंतर उरलेल्या निधीच्या ८०% हिस्सा ग्रामपंचायतींना व २०% निधी जिल्हास्तरावरून कामे पूर्ण करण्याकरिता राखीव ठेवण्याचे बंधन होते. जिल्ह्याच्या आर्थिक तरतुदीच्या ५% निधी आस्थापना व तालुका पातळीवर ... करिता १०% निधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार व ग्रामीण भूमिहीन रोजगार कार्यक्रमांतर्गत आणि जवाहर रोजगार योजनेअंतर्गत निर्माण केलेल्या मालमत्तेची दुरुस्ती व देखभाल यासाठी राखीव ठेवावा. राज्यस्तरावरून ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे २०% निधी विविध योजनेकरिता जिल्ह्यांना वाटून दिलेला आहे. ग्रामपंचायतींना मिळणाऱ्या एकूण तरतुदीच्या १५% निधी ग्रामपंचायत क्षेत्रातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या सार्वजनिक लाभार्थी कामाकरिता विनियोजित करावयाचे आहेत. हा १५% निधी अन्यत्र कोणत्याही योजनांकरिता कामावर विनियोजित केला जाणार नाही, याचे बंधन केंद्र सरकारने घालून दिले आहे. हे बंधन लक्षात घेता ... १५% निधी अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या वैयक्तिक कामाकरिता विनियोजित करावयाचा आहे. राखीव ठेवावयाचा निधी

९. जवाहर रोजगार योजनेअंतर्गत जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींच्या आर्थिक कृती आराखड्याची तपासणी करण्याच्या दृष्टीने पंचायत समिती ... सर्व ग्रामपंचायतींना मंजूर कामे व त्या कामावरील अनुदानाचे सर्व तपशील ... करून जिल्ह्याकरिता आर्थिक तरतुदीच्या १२५% एवढ्या रकमेचा आर्थिक कृती आराखडा दरवर्षी तयार करण्यात यावा. कामे घेताना आर्थिक कृती आराखड्यातील कामे घेण्यास परवानगी. आर्थिक कृती आराखड्याबाहेरील कामाकरिता निधी उपलब्ध करून देण्यात येऊ नये. आर्थिक आर्थिक कृती आराखडा

कृति आराखडा तयार करताना मागील वर्षांची अपूर्ण कामे प्राधान्याने पूर्ण करण्याकरीता त्यांना आवश्यकते प्रमाणे निधी उपलब्ध करून द्यावा. ज्या पंचायतींनी अपूर्ण कामे पूर्ण न करता नव्या कामाची आखणी केली असेल व तशा प्रकारचा प्रस्ताव पंचायत समितीस प्राप्त झाला असल्यास अशा ग्राम पंचायतींना नव्या कामांना तांत्रिक मंजूरी देऊ नये. जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींनी घेतलेल्या कामांना जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या नियामक मंडळाने मंजूरी प्रदान करणे आवश्यक आहे. ग्रामपंचायत स्तरावर कामाची निवड करताना कामे लोकांच्या स्थानिक गरजा व निकड लक्षात घेऊन निवडलेली आहेत याची खात्री करून घ्यावी. त्याप्रमाणे ग्राम पंचायत क्षेत्रातील अकुशल कामगारांच्या व स्त्रियांच्या गरजा भागविल्या जातील याकडेही ग्राम पंचायतीने वार्षिक कृति अहवाल तयार करतांना विशेष लक्ष दिले पाहिजे. जवाहर रोजगार योजनेअंतर्गत ग्रामपंचायतीने घेतलेल्या कामांची प्रगती ग्रामसभेसमोर वर्षातून किमान दोनदा तरी सादर करावयास पाहिजे. कोणत्या प्रकारचे काम निवडावयाचे हे ठरविताना ज्या कामांकरीता मोठ्या स्वरूपातील तांत्रिक बाबी आवश्यक आहेत. कामांची अंदाजित किंमत मोठ्या स्वरूपाची आहे आणि ज्या कामांवर कुशल कामगार अथवा साहित्य खर्च जादा प्रमाणात होणार आहे अशी कामे घेण्यात येऊ नयेत. पंचायत समिती स्तरावर ग्राम पंचायतीने प्रस्तावित केलेल्या संपूर्ण कामावरील खर्च किमान ६०%-पेक्षा कमी मजुरीवर खर्च होणार नाही अशी कामे घेण्यात यावीत. एखाद्या पंचायतीने ६०% हून कमी खर्च मजुरीवर व १५% अनुसूचित जाती व जमातीच्या लाभार्थी कामावर प्रस्तावित केला नसल्यास त्या पंचायतीची कामे नामंजूर करण्यास शासनाची हरकत नाही. इमारत बांधकामे मोठ्या प्रमाणात घेतली जातात असे दिसून आल्यामुळे ग्रामपंचायतींनी अनुज्ञेय निधीच्या कमाल २५% निधी इमारत बांधकामावर विनियोजित करावा यापेक्षा जास्त प्रमाणात खर्च करावयाचा असल्यास इतर साधनांद्वारे निधी उभारण्यात यावा व याची स्पष्ट नोंद वार्षिक कृति अहवालात घेण्यात यावी.

ग्राम पंचायतीनी प्रस्तावित केलेल्या कामांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करतांना कंत्राटदाराकरवी कामाची अंमलबजावणी केली जाणार नाही, याची खात्री करून घेण्यात यावी. वार्षिक कृति अहवाल तयार करतांना जिल्हास्तरावर राखून ठेवलेल्या २०% निधीच्या विनियोजनाची बाबही समाविष्ट करण्यात यावीत.

कामा[illegible] देखभा[illegible] दुरुस्त[illegible] आ[illegible]

१०. जवाहर रोजगार योजनेंतर्गत पूर्ण झालेली कामे संबंधित विभागांना हस्तांतरीत करण्यात आलेली आहेत. त्या कामांची देखभाल व दुरुस्ती करीता त्या त्या विभागाची जबाबदारी राहिल अशा कामांना देखभाल व दुरुस्तीकरीता जवाहर रोजगार योजनेमधून निधी उपलब्ध करुन दिला जाणार नाही. मालमत्तेची देखभाल व दुरुस्तीकरीता ग्रामपंचायतीची [illegible] रक्कम संबंधित तांत्रिक कर्मचाऱ्याने प्रमाणित करुन व मालमत्तेची देखभाल व दुरुस्ती करणे आवश्यक आहे अशा प्रकारचा दाखला योग्य त्या अंदाजित किंमतीसह पंचायत समितीस सादर करावयास पाहीजे. रोजगार निर्मितीच्या कार्यक्रमामधून जसे राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम आणि ग्रामीण भूमिहीन रोजगार कार्यक्रम यामधून घेण्यात आलेल्या आणि पूर्ण झालेल्या कामाकरीता १०% राखीव निधीमधून निधी उपलब्ध करुन द्यावयाचा आहे.

पुर[illegible] (स[illegible] ता[illegible] घा[illegible]

११. जवाहर रोजगार योजनेंतर्गत ग्राम पंचायतीने प्रस्तावित केलेल्या कामाची अंदाजपत्रकीय किंमत मंजुरी करीता ६०% पेक्षा कमी असता कामा नये. ग्राम पंचायत क्षेत्रातील लोकांची निवड व गरज लक्षात घेता इमारत कामे पंचायतीनी प्रस्तावित केली असल्यास इमारत बांधकामावरील साहित्यखर्च भागविण्याकरीता स्थानिक गरजा कार्यक्रम, लघु-[illegible] योजना व शिक्षण व सेवा योजना विभागामधून उपलब्ध होणारा निधी आणि लोकवर्गणीद्वारा पूरक निधी म्हणून वापरण्यात यावा. हा निधी साहित्य खर्चावर होणारा जादा खर्च भागविण्याकरीता म्हणून वापरण्यात यावा. तदरहू कामांची माहिती जिल्ह्याचे वार्षिक कृती आराखड्यामध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे. याकरीता पंचायत समिती निहाय ग्राम पंचायत क्षेत्रातील कामाची निवड करताना कोणत्या कार्यक्रमांतर्गत अतिरिक्त निधी उपलब्ध करुन दिला जाणार आहे याची प्रथमतः खात्री करुन घेण्यात यावी. तदनंतर अशा पंचायतीच्या कामांना मंजुरी प्रदान करण्यात यावी.

योजने[illegible] अंतर्गत मजुरांन[illegible] द्यावय[illegible] च्या मजुरीस[illegible]

१२. जवाहर रोजगार योजनेंतर्गत काम करणाऱ्या मजुरांना राज्य शासनाने ठरवून दिलेल्या व रोजगार हमी योजनेंतर्गत विहित केलेल्या परिमंडळातील दरा प्रमाणे अकुशल कामगारांना मजूरी देणे बंधनकारक आहे. याची नोंद घ्यावी.

१२.१ महानगरपालिका, नगरपालिका यांच्या लगत असलेल्या ग्राम पंचायत क्षेत्रामध्ये कुशल कामगारांना मोठ्या प्रमाणात मजूरी द्यावी लागते. सदरहू मजुरी प्रचलीत दराने इमारत बांधकाम करताना देणे अपरिहार्य होते. याकरीता ग्राम पंचायतीने कामे निवडताना श्रमप्रधान कामे घेऊन कुशल मजुरांना द्यावयाच्या मजूरीचा प्रश्न उद्भवणार नाही याची खात्री करुन घेणे आवश्यक आहे. अन्यथा कुशल कामगारांना द्यावयाच्या मोठ्या स्वरुपाची मजूरी इतर निधीतील रक्कम भागवून

या मुद्याचा प्रश्न शासनाच्या स्तरावर सोडविण्यात यावा. कारण जवाहर रोजगार योजनेतर्गत केंद्र सरकारने ठरवून दिलेल्या रोजगार निर्मिती-चे लक्ष्य साध्य करताना कुशल मजूरी दर हा योजनेतर्गत मंजूरी खर्चामध्ये समाविष्ट करावयाचा नाही. अशा स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत. याचा परिणाम असा होतो की, रोजगाराच्या संधी कमी प्रमाणात उपलब्ध केल्या जातील हे टाळता होणार नाही.

इंदिरा आवास योजना

१३. सातव्या पंचवार्षिक योजना काळातील राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम आणि ग्रामीण भूमीहीन रोजगार कार्यक्रमाखाली १९८५-८६ पासून दारिद्र्य रेषेखालील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या बेघर कुटुंबांना विनामूल्य घरे बांधून देण्याची योजना म्हणून इंदिरा आवास योजना कार्यान्वित केलेली आहे. या योजनेंतर्गत वर नमूद केलेले दोन्ही कार्यक्रम व नव्याने कार्यान्वित केलेली जवाहर रोजगार योजना मिळून मार्च९० अखेर ६४,४२५ घरकुले योग्य त्या परिसर सुविधांसह राज्यात बांधण्यात आलेली आहेत. या घरकुलांकरीता राज्याच्या एकूण तरतूदीच्या ६% निधी इंदिरा आवास योजनेकरीता राखीव ठेवण्यात येतो. हा राखीव निधी चालू आर्थिक वर्षापासून जिल्ह्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या १९८१ च्या जनगणनेच्या प्रमाणात वाटून देण्यात येतो. त्या-नुसार जिल्ह्यांना घरकुलाचे भौतिक उद्दिष्ट ठरवून देण्यात आले आहे. सदरहू योजनेंतर्गत नुकतेच केंद्र सरकारचे इंग्रजी पत्र क्र. एम-२००४२/८७/जेआर-वाय-दोन-[व्हॅल्यू-II] दिनांक ४ जून १९९० अन्वये प्रती घरकुल किंमतीचे निकष व परिसर सुधारणेच्या किंमतीमध्ये सुधारणा केलेली आहे. ही बाब जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, व प्रकल्प संचालक यांच्या निदर्शनासही आणून दिलेली आहे. सदरहु सुधारीत किंमतीचे निकष लक्षात घेवून १९९०-९१ च्या घरकुलाचे भौतिक उद्दिष्ट ठरवून देताना लक्षात घेण्यात आलेले आहे. पात्र लाभार्थींची निवड करणे, घरकुल मंजूर करणे इत्यादी बाबी महसूल व वन विभागाचे परिपत्रक क्र. १०८६/सीआर ३५५५/र-१२, दि. २१ मे १९८७ मधील सूचनांचे काटेकोरपणे पालन करून कार्यान्वित करण्यात याते.

दशलक्ष विहिर योजना
(जीवनधारा योजना)

१४. केंद्र सरकारने १९८८-८९ या आर्थिक वर्षात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम व ग्रामीण भूमिहीन रोजगार कार्यक्रमाखाली एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमांतर्गत तयार करण्यात आलेल्या दारिद्र्य रेषेखालील यादीमध्ये ज्या अनुसूचित जाती व जमातीच्या अल्प व अत्यल्प भूधारकांचा समावेश केलेला आहे अशा पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या जमिनीवर मोफत विहिरी खोदून देण्याचा कार्यक्रम कार्यान्वित करण्यात आलेला होता. त्यानुसार केंद्रसरकारने दोन्ही कार्यक्रम मिळून रुपये ४१.७० कोटींची तरतूद करून दिलेली होती. या तरतुदी-मधून राज्य शासनाने जिल्ह्यांना ठरवून दिलेल्या भौतिक उद्दिष्टाप्रमाणे १८००० विहिरींची कामे पूर्ण करावयाची होती. परंतु प्रत्यक्ष अंमलबजावणीमध्ये अडी-अडचणींचा विचार करता राज्यात मार्च, १९९० अखेर १०,८५३ विहिरी पूर्ण बांधण्यात आलेल्या असून ७,८५९ विहिरींची कामे प्रगतीपथावर असल्याचे दिसून येते. या विहिरींच्या कामावर एकूण रुपये ३९.५५ कोटी खर्च करण्यात आलेला आहे. सदरहू योजनेतील खोदकामाच्या विहिरींची प्रगती लक्षात घेता सदरहू कार्यक्रमास ३०.६.१९८९ आणि ३०.६.१९९० पर्यंत मागील दोन वर्षात मुदतवाढ देऊन हाती घेण्यात आलेल्या विहिरींची कामे पूर्ण केली जातील या करीता वाढवून देण्यात आली.

१४.२ केंद्र सरकारने १.४.१९८९ पासून कार्यान्वित केलेल्या जवाहर रोजगार योजनेंतर्गत जीवनधारा विहिरींकरीता स्वतंत्र तरतूद करून दिलेली नव्हती. आणि म्हणून १९८९-९० मध्ये ठरवून दिलेले आर्थिक व भौतिक उद्दिष्ट लक्षात घेऊन त्याचा पाठपुरावा शासन स्तरावरून करण्यात आला. त्यानुसार ६,४२८ विहिरींची कामे १९९०-९१ या आर्थिक वर्षात पूर्ण करण्याकरीता शासनस्तरावर योग्य तो पाठपुरावा केला जात आहे.

१४.३ जवाहर रोजगार योजनेंतर्गत चालू आर्थिक वर्षापासून राज्याच्या एकूण तरतुदीच्या २०% निधी ६,४०.८५ कोटी तरतूद दशलक्ष विहिरी योजनेकरीता केंद्रसरकारने ठरवून दिलेली आहे.

या योजनेअंतर्गत सिंचन विहिरी, बुडबंधारण व खोलीकरण आणि लघुपाट-बंधारे-यांची कामे अनुसूचित जाती व जमातीच्या पात्र लाभार्थींच्या शेत-जमिनीवर कार्यान्वित करावयाची आहेत. या प्रकारच्या लाभार्थींची निवड करणे व त्यांना मंजुरी देणे यासाठीची कार्यवाही शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्र. एमइजीएस-१०८८/[रा.ग्रा.रो.यो. ग्रा.भू.रो.का]/ रोजगार ५३८/८८-८९/३८, दि. ५ ऑक्टोबर १९८८ अन्वये करण्यात यावी. बुडबंधारणे [illegible], लघुपाटबंधाऱ्यांची कामे पाटबंधारे संबंधित विभागांनी ठरवून दिलेल्या [illegible] निकषाप्रमाणे कार्यान्वित करण्यात यावे. राज्यातील [illegible] जिल्ह्यांतील [illegible] योजनेअंतर्गत राज्याने [illegible] ५,५०० सिंचन विहिरींचे उद्दिष्ट ठरवून दिले आहे. [illegible] राज्यातील भूजल विभाग [illegible] भौगोलिक परिस्थितीनुसार [illegible]